जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -१७ दिनांक -११/०१/२०२५**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक - २, गुन्हे शाखा,पुणे शहर.

## डांबुन ठेवलेल्या तामिळनाडु येथील एका युवकाची सुरक्षित सुटका करुन ६ आरोपीत इसमांना गुन्हे शाखेने घेतले ताब्यात

एक इसम वय ३५ वर्षे, रा. तिरुवन्नामलाई, तामिळनाडु हा दि. ०६/०१/२०२५ रोजी तामिळनाडु येथुन मुंबई करता निघाला होता. त्यानंतर दि. ०९/०१/२०२५ रोजी पिडीत इसम याने त्याचे फोनवरुन त्याचे नातेवाईकांना तिरुवन्नामलाई तामिळनाडु येथे फोन करुन कळविले की, त्याला काही लोकांनी किडनॅप केले आहे. आणि त्याला हॉटेलवर नेवुन फार मारहाण करत आहेत ते पुणे शहरात ओहत. याबाबत मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे यांच्याकडुन माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकांनी तांत्रिक माहितीच्या आधारे सतत फुरसुंगी कंजीरवाडी, शेवाळवाडी, त्यानंतर शिक्रापुर नगर रोड या परिसरात तपास करुन यातील पिडीत इसम यास सुरक्षितरित्या दि. १०/०१/२०२५ रोजी रात्रौ मुक्तता करुन खालील नमुद आरोपी यांना ताब्यात घेतलेले आहे.

१) मोहमंद फर्मान मेहेरबान, वय २७ वर्षे, रा. नरुलापुर ता. जि. बिजनौर राज्य उत्तरप्रदेश
२) अर्जुनकुमार शिवकुमार, वय २८ वर्षे, रा. सदर
३) देवेंद्र सुनिल अलभर, वय २५ वर्षे, रा. गाव देवदैठण, ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर
४) अंकित अर्जुन अडागळे, वय २५ वर्षे, रा. पवई आय.टी.आय. मार्केट, मुंबई,
५) प्रियांक देवेंद्र राणा, वय ३३ वर्षे, रा. ४०१/१, न्यु आदर्शनगर, रुडकी, जि. हरिद्वार, राज्य उत्तराखंड,
६) अविनाश दत्तात्रय कदम, उवय ४३ वर्षे, रा. शिक्रापुर मलठण फाटा, शिक्रापुर, पुणे

यातील फिर्यादी यांना त्यांचे बिन्नास प्रा. लि. कंपनीचे मॅनेजर यांचे मध्ये झालेल्या ३००० यु.एस.डॉलर डी. टी. करंसी खरेदीचे आर्थिक व्यवहाराचे कारणावरुन फिर्यादी यांना पिंगारा हॉटेल सोलापुर रोड, हडपसर, पुणे येथे हाताने मारहाण करुन धमकी देवुन बेकायदेशिर डांबुन ठेवले आहे. अशी हकीकत समजल्याने फिर्यादी यांचा सविस्तर जबाब नोंद करुन हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा रजि. नं. ४६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १२७ (७), ११५ (२), ३५१(२), ३(५) अन्वये कारवाईसाठी वरिष्ठांचे मार्गदर्शनाप्रमाणे हडपसर पोलीस स्टेशन येथे वरील नमुद आरोपींताना पुढील कारवाई कामी हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे हजर केले आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त श्री. रंजन कुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. निखील पिंगळे, मा. सहा पोलीस आयुक्त गुन्हे- २ श्री. राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजय कुंभार, ( खंडणी विरोधी पथक २ ), पोलीस निरीक्षक संदीपान पवार (दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक २), पोलीस निरीक्षक युवराज हांडे ( युनिट ५), पोलीस निरीक्षक वाहिद पठाण (युनिट ६), सहा. पोलीस निरीक्षक सी. बी. बेरड, तसेच वरील अधिकारी यांचेकडील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

